

कर्नाटक सरकार

परिसर अध्ययन
ENVIRONMENTAL STUDIES

अभ्याससहित पाठ्यपुस्तक
TEXT CUM WORK BOOK

(REVISED)

मराठी माध्यम
MARATHI MEDIUM
PART - 2



इयत्ता चौथी
FOURTH STANDARD

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)

6th Cross, Malleshwaram
Bangalore - 560 003.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनुक्रमणिका

C2C9Z4

पा.क्र.	पाठ	पृष्ठ संख्या
13.	आपले शरीर – एक अद्‌भुत यंत्र	1 - 11
14.	वाहतुकीचे नियम	12 - 20
15.	पारंपारिक वाहतूक आणि संपर्क	21 - 30
16.	बदलणारी कुटुंबे	31 - 39
17.	घर – ही पहिली शाळा	40 - 45
18.	व्यक्तिंची वैशिष्ट्ये	46 - 53
19.	उद्योगांची वैशिष्ट्ये	54 - 59
20.	सण एक आनंद	60 - 67
21.	खो	68 - 79
22.	सुविधा – सुधारणा	80 - 85
23.	वस्त्र – वैविध्यता	86 - 92
24.	मेघदादाचा प्रवास	93 - 104
25.	आपले राज्य – आपला अभिमान	105 - 118

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 13

आपले शरीर – एक अद्‌भूत यंत्र


F2A5B1

या पाठाच्या अध्यायनंतर तू,

- शरीरात चालणाऱ्या मुख्य क्रिया आणि त्यांना संबंधीत मुख्य अवयवांची ओळख करुन घेशील.
- स्वच्छतेच्या सवयीने या अवयवांचे आरोग्य टिकविण्याची जाणीव करुन घेशील,
- उत्तम आरोग्यदायी सवयी जाणून घेशील.

मागील इयत्तेत शिकलेल्या ज्ञानेंद्रीय आणि त्यांचे कार्य यांची आठवण कर. ज्ञानेंद्रीय आणि त्यांच्या कार्याची यादी खाली दिली आहे रेघा मारुन जोड्या जुळव.

अ	आ
डोळे	वास घेण्यासाठी मदत
कान	चव घेण्यासाठी मदत
नाक	वस्तू पहाण्यासाठी मदत
जीभ	गरम, थंड इत्यादी अनुभव घेण्यासाठी मदत
त्वचा	आवाज ऐकण्यासाठी मदत



हे अवयव आपणाला दिसणारे आहेत. आमच्या शरीराच्या आत काही अवयव आहेत. ते आम्हाला दिसत नाहीत. त्यांच्याबद्दल जाणून घेऊया.

तुझी त्वचा पहा. त्याच्या खाली मांस आणि हाडे आहेत. ती तुला दिसत नाहीत. त्यावर आवरणासारखी असलेली त्वचा देहाचे रक्षण करते. त्वचा, हाडे आणि मांस यांच्यामुळे आमच्या शरीराला आकार व रुप येते. तुझ्या शरीराचा आकार व रुप तसेच तुझ्या मित्राच्या/मैत्रिणीच्या शरीराचा आकार व रुप यात फरक आहे. निरीक्षण कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आमच्या शरीरात अनेक क्रिया चालू असतात. श्वसन, पचन, रक्ताभिसरण व उत्सर्जन इत्यादी क्रिया आमचे शरीर सुदृढ व निरोगी ठेवतात. शरीरात असलेली विविध इंद्रीये आणि त्यांचा सहभागाने होणाऱ्या क्रिया यांच्याबद्दल जाणून घे.


श्वसन

तू नाकावाटे हवा शरीरात घेतोस हे तुला समजले आहे.

हे करुन पहा :

तुझा हात तुझ्या छातीवर ठेव. नाकावाटे हळूवारपणे हवा आत घे. तसेच हळूवारपणे हवा बाहेर सोड. छातीवर ठेवलेल्या हाताला कोणती जाणीव झाली?

चित्र पहा. हवा शरीराच्या ज्या भागातून आत जाते त्याच भागातून बाहेर येते. त्यामुळे छातीवर असलेल्या हाताला छातीचा आकार जास्त कमी झाल्याची जाणीव होते. चित्रात हवा आत बाहेर जाण्याचा मार्ग आणि अवयव दर्शविले आहेत त्यांची क्रमाने नावे लिही.



1. _____

2. _____

3. _____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

हवेमध्ये असलेला **ऑक्सिजन** नावाचा वायू आमच्या शरीराला पाहिजे. फुप्फुसे हवेतील ऑक्सिजन शोषून घेतात व तिथे जमलेला शरीराला नको असलेला **कार्बन डाय ऑक्साईड** नावाचा वायू हवेत मिसळतो आणि श्वासनलिका आणि नाकावाटे शरीराबाहेर सोडला जातो.

ऑक्सिजन शरीरात घेऊन कार्बनडाय ऑक्साईड बाहेर सोडण्याच्या क्रियेला 'श्वसन' म्हणतात.

हे करुन पहा :

तू एका मिनीटात किती वेळा श्वासोच्छवास करतोस ? मोज.


श्वासोच्छवास करताना काही समस्या येऊ नयेत यासाठी आरोग्यदायक सवयी ठेव. त्यातील काही इथे दिल्या आहेत.

जाणून घे.

- अंघोळ करताना नाक स्वच्छ कर.
- झोपताना तोंडावर पांघरुण घेऊन झोपू नकोस.
- जास्त धूळ असलेल्या भागात फिरताना नाकात धूळ जाणार नाही याची काळजी घे.
- जेवण करताना, पाणी पिताना गडबड करु नकोस.
- खूप धूर असलेल्या ठिकाणी जाऊ नकोस. खूप धुरामध्ये श्वासोच्छवास केल्यामुळे फुप्फुसाना समस्या निर्माण होतात.
- दिवसातून एकदा तरी ताठ बसून दहा वेळा दीर्घश्वसन करण्याची सवय कर.
- नाकात काडी, पेन, खडू यासारख्या कोणत्याही वस्तू घालू नकोस.
- तोंडावाटे श्वासोच्छवास करु नको.
- खोकताना, शिंकताना तोंडावर रुमाल धर. तुला सर्दी खोकला असताना तोंडावाटे सुक्ष्म रोगजंतू हवेत मिसळणार नाहीत याची खबरदारी घे. त्यामुळे खोकला अथवा सर्दी इतराना होणार नाही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रक्ताभिसरण



हे चित्र पहा त्याचे नाव इथे लिही.

शरीराच्या कोणत्याही भागात जखम झाल्यास त्यातून रक्त येते हे तू पाहिला असशील. रक्ताचा रंग कोणता ते इथे लिही.

शरीराच्या संपूर्ण भागांना रक्ताचा पुरवठा होतो हे तुला माहीत आहे. शरीराच्या सर्व भागांना रक्त पुरवठा करणाऱ्या शरीरातील मुख्य अवयवाला हृदय म्हणतात.

हे तू स्वतः कर :

मूठ तयार होण्यास डाव्या हाताची बोटे मिटव. तुझ्या हृदयाचा आकार तुझ्या डाव्या हाताच्या मुठी एवढा असतो.



फुप्फुसाबद्दल तुला अगोदरच माहिती आहे. हृदय हे दोन फुप्फुसांच्यामध्ये थोडेसे डावीकडे झुकलेले असते. छातीच्या बरगड्यामुळे त्याचे रक्षण होते.

विहिरीतील पाणी पंपच्या साहाय्याने बाहेर काढतांना तू कधी पाहिले आहेस? अशाच रितीने, हृदयसुद्धा रक्त पंप करुन रक्तवाहिन्याद्वारे शरीरातील सर्व भागांना रक्ताचा पुरवठा करते.

हे तू स्वतः कर :

तुझा हात तुझ्या मित्राच्या छातीवर ठेव हृदयाचा लब-डब असा आवाज तुला जाणवेल. जेव्हा हृदय रक्त पंप करते तेव्हा हा आवाज निर्माण होतो.


रक्त शरीराच्या सर्व भागात फिरत असते. शरीराच्या सर्व भागातून कार्बनडाय ऑक्साईड आणतांना ते अशुद्ध बनते. हे अशुद्ध रक्त रक्तवाहिन्यामार्फत हृदयात जमा होते.

हृदयातून अशुद्ध रक्त फुप्फुसाकडे जाते, तिथे कार्बनडाय ऑक्साईड सोडून ऑक्सिजन शोषून घेऊन शुद्ध होते. हे शुद्ध रक्त रक्तवाहिन्यातून परत हृदयाकडे येते. ऑक्सिजन असलेले हे शुद्ध रक्त रक्तवाहिन्याद्वारे शरीरातील सर्व अवयवांना पुरविले जाते. यालाच आपण **रक्ताभिसरण**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


म्हणतो. डॉक्टर हृदयाच्या ठोक्यांचे परिक्षण कसे करतो ? तू पाहिला आहेस?

हृदयाचे ठोके मोजण्याच्या उपकरणाचे चित्र येथे दिलेले आहे. तू त्याचे नाव लिही.



तू हे स्वतः कर :

तीन प्लास्टिकच्या नलिका, एक 'T' आकाराची ट्युब, एक लहानसे नरसाळे, एक पातळ रबर किंवा प्लास्टीकचा तुकडा आणि गोल रबर घे. चित्रात दाखविल्याप्रमाणे ते सर्व जोड. तुझा स्टेथॅस्कोप तयार झाला.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED


स्टेथॅस्कोपचे नरसाळे तुझ्या मित्राच्या छातीवर ठेव दोन नालिका तुझ्या कानात ठेव आणि मित्राच्या हृदयाचे ठोके मोज.

एका मिनिटात हृदयाचे ठोके किती पडतात ? तुझे तळवे छातीवर ठेव आणि हृदयाचे ठोके मोज.

शरीराच्या योग्य रक्ताभिसरणासाठी नियमित पणे पालेभाज्या आणि फळे खा. दररोज व्यायाम कर.

तू नियमित अन्न खातोस का ? ते कोठे जाते? तू खालेल्या अन्नाचे काय होते ? तुला माहीत आहे का ?

पचन



चित्राचे निरीक्षण कर. खाल्लेले अन्न एक इंद्रियातून दुसऱ्या इंद्रियात सरकत असते. चित्र बघ आणि त्यातील इंद्रियांची नावे लिही.

1.

2.

3.

4.

5.

6.

7.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता तुझ्या तोंडाच्या भागांची नावे लिही.

_____

अन्न पदार्थांचे चर्वण करण्यास मदत कोण करते?

_____

जीभेचे कार्य कोणते ?

_____



तोंडातील दात अन्नपदार्थांचे चर्वण करुन बारीक कणात रुपांतर करतात.


मऊ झालेले अन्न
अन्ननलिकेतून जठरात येते.






जठरातील अन्नाचे काही वेळात पचन होते.
ते येथे सुमारे तीन ते चार तास राहते.

नंतर अन्न लहान आतडयात येते आणि राहिलेल्या
अन्नाचे पचन होते. पचलेल्या अन्नाचे लहान आतड्यात
रक्त तयार होऊन ते संपूर्ण शरीराला पुरविले जाते.





न पचलले अन्न मोठ्या आतड्यात येते आणि
शरीराबाहेर विष्टेच्या रुपात गुदद्वारावाटे
बाहेर टाकले जाते.

अन्नाचे पचन होऊन त्याचे रक्तात रुपांतर होण्याच्या क्रियेला **'पचन'** असे म्हणतात.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

खेळ खेळा

पचनेंद्रियांच्या नावांच्या चिठ्ठया तयार करुन त्या एका पेटीत ठेव. तुझ्या मित्रांना प्रत्येकाने एक चिठ्ठी उचलण्यास सांग. चिठ्ठीत लिहिलेल्या इंद्रियाचे कार्य त्यांना सांगण्यास सांग. हा खेळ पुन्हा खेळा. आवश्यकता भासल्यास शिक्षकांची मदत घे.



जाणून घे.

आहाराच्या चांगल्या सवयी

- जेवण करण्यापूर्वी आणि जेवण झाल्यानंतर हात स्वच्छ धू.
- बिन्स, मुळा यासारखा तंतूमय आहार खा.
- गरम पौष्टिक आहार खा.
- जेवण झाल्यानंतर तोंड, दात आणि जीभ स्वच्छ कर.
- आहाराचे सावकाश आणि योग्यरितीने चर्वण कर.
- चार तासानंतर एक वेळ जेवण करणे चांगले.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED


चित्रात दिलेल्या इंद्रियांचे कार्य दिलेल्या जागेत लिही.












@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उत्सर्जन :

घरकामातील अनेक क्रियांमधून कचरा तयार होत असतो दररोज हा कचरा आम्ही बाहेर टाकतो. याच प्रकारे आपल्या शरीरात पचनासारख्या जैविक क्रियांमधून किती तरी अनावश्यक घटक तयार होत असतात. ते टाकाऊ पदार्थ होत. जर हे टाकाऊ पदार्थ तसेच शरीरात राहिले तर त्यांच्यापासून रोग होऊ शकतात. तुला माहीत आहे की, असे टाकाऊ पदार्थ शरीर त्वचा आणि फुप्फुसाद्वारे बाहेर टाकते हे उत्सर्जक अवयव होत.

शरीर, मुत्रावाटे सुद्धा टाकाऊ पदार्थ बाहेर टाकते. आता आपण या क्रियेला मदत करणाऱ्या उत्सर्जक इंद्रियांची माहिती करुन घेऊ.



चित्राचे निरीक्षण कर. त्यातील भागांची नावे खाली लिही.

1) _____

2) _____

3) _____

4) _____

आपल्या पाठीच्या कण्याच्या खाली मूत्रपिंडाची एक जोडी दोन्ही बाजूला असते. येथे रक्त शुद्ध होते. रक्तातील अशुद्ध घटक येथे वेगळे केले जातात. हे अशुद्ध घटक म्हणजे टाकाऊ पदार्थ मूत्रवाहिनीतून मूत्राशयात येतात. नंतर युरेथ्रामार्फत मूत्ररुपाने शरीराबाहेर टाकले जातात.

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

शरीरातील कार्बन डाय ऑक्साईड बाहेर टाकणारे इंद्रिय कोणते ?

_____

शरीरातील अशुद्ध घटक घामाच्या रुपात बाहेर टाकणारे इंद्रिय कोणते ?

_____

शरीरातील अशुद्ध घटक द्रवरुपात बाहेर टाकणारे इंद्रिय कोणते ?

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.

- नियमितपणे मूत्र बाहेर सोड.
- दररोज अंघोळ करून, स्वच्छ कपडे घाल.
- दररोज चेहरा, हात व पाय वरचेवर धुत रहा. घामाच्या स्वरुपात साठलेला टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होईल. त्वचा स्वच्छ होऊन घामाची रंध्रे उघडी राहतील.
- दररोज कमितकमी 2 लिटर शुद्ध पाणी पी. त्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ घाम व मूत्र रुपात बाहेर टाकण्यास मदत होईल.

आपले शरीर हे एक आश्चर्यकारक यंत्र आहे हे तु शिकला आहेस. यात श्वसन, रक्ताभिसरण, पचन आणि उत्सर्जन सतत चालू असते. आपल्या शरीराचे कार्य योग्य रितीने चालण्यासाठी काही पायऱ्या समजावून घेऊ.



जाणून घे.

- वेळेवर जेवण करणे आणि टाकाऊ पदार्थांचे उत्सर्जन करणे याची सवय लावून घे.
- खेळ खेळत रहा, व्यायाम कर आणि दररोज सकाळी फिरायला जा.
- पौष्टिक आहार सेवन कर. जास्त तळलेले पदार्थ आणि गोड पदार्थ खाऊ नकोस.
- दररोज अंघोळ कर आणि शरीर स्वच्छ ठेव. दररोज स्वच्छ धुतलेले कपडे वापर.

हे तुला माहीत आहे का ?

- आपल्या शरीरात सुमारे 206 हाडे आणि 600 पेक्षा जास्त सांधे आहेत.
- तुझी उंची जरी आता तीन फूट असली तरी, तुझी पचनेंद्रिये 20 फूट लांबाची आहेत. ती गुंडाळलेल्या स्थितीत असतात.
- एका मिनिटामध्ये आपल्या हृदयाचे ठोके 70 पडतात आणि एका दिवसात सुमारे एक लाख पडतात.
- फुप्फुसामध्ये तीन लिटर हवा भरु शकते.
- मानवी शरीरात सुमारे 5.5 लिटर रक्त असते.
- रक्तदान केल्यानंतर पुन्हा रक्त तयार होते. त्यासाठी 4 ते 5 आठवड्यांची गरज असते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 14

वाहतुकीचे नियम


G6M1G2

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- वाहतुकीची चिन्हे, सुरक्षितेसाठी वाहतुकीचे नियम आणि त्याचे पालन समजावून घेशील.

रस्तावरुन चालत जाताना किंवा प्रवास करतांना तू रस्ताच्या बाजूला अनेक चिन्हांचे बोर्ड लावलेले तू पाहिला असशील. ते काय दर्शवितात हे तुला माहीत आहे का? खालील चित्ररुप गोष्ट वाच.

सविता, फातिमा, निरज, मेरी आणि त्यांचे शिक्षक शहरातील रस्ताच्या पदपाथवर उभे आहेत. वाहतूक पोलीस वाहनांच्या येण्याजाण्यावर नियंत्रण ठेवत आहे.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्याच वेळेला दुसरा वाहतुक पोलीस त्यांच्या जवळ आला. शिक्षकांनी त्यांची ओळख करुन दिली.



NOT TO BE REPUBLISHED

एवढ्यात निरजने दिवा पाहिला.




© NOT TO BE RE

तेवढयात लाल दिवा पेटला होता. वाहने पुढे जाण्याची थांबली. शिक्षक व विद्यार्थी रस्ता ओलांडण्यास निघाले.



ते सर्व झेब्रा पट्ट्यावरुन रस्ता ओलांडून गेले.



मुलांना वाहतुकीचे नियम समजल्याने आनंद वाटला. ती सर्व शाळेला गेली.

NOT TO BE REPUBLISHED

तुम्ही चित्र रुपातील माहीती वाचली. हो की नाही ?

सविता, निरज, आणि मेरी हे वाहतुकीच्या नियमा संबंधी थोडे फार शिकले आहेत आणि वाहतूक पोलिसाकडून काही सूचना त्यांना मिळालेल्या आहेत. तुम्ही वाहतुकीचे नियम शिकला आहात.

- पादचाऱ्यांनी कोठून रस्ता ओलांडावा ?

_____

_____

- सिग्नल दिव्यांचे रंग सांगा.

_____

_____

_____

- सिग्नल दिव्यांचा एक उपयोग लिहा.

_____

- तुम्ही शाळेला येत असताना रस्त्यावर सिग्नल दिवे लागतात का ?

_____

- रस्ता ओलांडताना तुम्ही कोणकोणत्या खबरदाऱ्या घ्याव्यात ? का?

_____

_____

_____

_____

काही सांकेतीक खुणा व त्यांचा अर्थ पुढील पानावर दिलेले आहेत. रेषेने त्यांच्या जोड्या जुळवा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अ	ब
	पुढे वेग नियंत्रक उंचवटे आहेत. सावकाश जा.
	रेल्वे फाटक उघडे आहे. पहा आणि जा.
	डावीकडे वळण आहे.
	रुग्णालय प्रदेश, सावकाश जा.
	वाहने लावण्याचे ठिकाण.
	सावकाश जा.
	हॉर्न वाजवू नका.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वाहतूक सुरक्षितपणे होण्यासाठी आम्हास मदत करणाऱ्या नियमांना 'वाहतुकीचे नियम' म्हणतात. आमच्या सुरक्षतेसाठी वाहतूकीचे सिग्नल्स् व सूचना फलक रस्त्याच्या कडेला बाजुने उभे केलेले असतात.

वाहतूक नियमांचे पालन केल्याने होणारे दोन फायदे कोणते ?

1. _____


2. _____

पादचाऱ्यांनी पाळावयाचे वाहतूकीचे नियम येथे दिलेले आहेत. जर ते बरोबर असतील तर (✓) अशी खुण करा आणि चूक असतील तर (✗) अशी करा व बरोबर करुन लिहा.

अ.नं.	वाहतुकीचे नियम	बरोबर	चूक	बरोबर उत्तर
1.	झेब्रा पट्टयावरुन रस्ता ओलांडा			
2.	जर सिग्नल दिवा नसेल तर तुम्ही रस्ता ओलांडा, जरी वाहनें तुमच्या उजवीकडे किंवा डावीकडे जात असली तरी.			
3.	रेल्वे येत असतांना तुम्ही रेल्वे फाटक ओलांडा.			
4.	रस्त्यावर अजिबात खेळू नका.			
5.	वाहनामध्ये चढतांना किंवा उतरतांना सावधगिरी बाळगा.			
6.	वाहनात चढतांना रांगेने चढा.			
7.	पादचाऱ्यांनी रस्ताच्या उजव्या बाजूने चालावे.			

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या परिसरात खालील प्रकारचे सिग्नलचे फलक कोठे आढळतात? दिलेल्या जागेत लिहा. खाली एक उदाहरण दिलेले आहे त्याचे निरीक्षण करा.

सिग्नल फलक	लावण्याचे ठिकाण
	माझ्या शाळेजवळ लावलेला आहे.
	
	
	
	
	
	



जाणून घे.

आम्ही वाहतूकीचे नियम पाळले तर आम्ही सुरक्षित राहू. वाहतूकीच्या नियमांचे पालन केल्यास अपघात टळू शकतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

घर आणि शाळा येथे होणाऱ्या काही लहान अपघाताबद्दल आपणाला माहिती आहेच. उदाहरणार्थ, विद्युत उपकरणे, गॅस शेगडी, चाकू, ब्लेड आणि कोयता किंवा विळा वापरतांना आपण जर काळजी घेतली नाही तर धोका होऊ शकतो. तुम्हाला माहीत असलेल्या पाच अपघातजन्य प्रसंग लिहा. त्यावेळी कोणती सावधगिरी बाळगावी ते सुद्धा लिहा.

अ.नं.	अपघातजन्य प्रसंग	सावधगिरी
1.		
2.		
3.		
4.		
5.		

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तुला माहीत आहे का ?

- वाहतूकीची गर्दी, इंधन वाचवणे व हवेचे प्रदूषण टाळणे यासाठी बेंगळूरमध्ये 'बस दिन' साजरा करण्यात आला. त्या दिवशी स्वतःची वाहने असणाऱ्या लोकांनी सुद्धा बसमधून प्रवास केला.
- प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात वाहतूक खाते 'रस्ता सुरक्षा आठवडा' साजरा करते.
- शहरामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांना वाहतूक नियमा संबंधी वाहतूक खाते प्रशिक्षण देते.
- रस्त्यावर अपघात झाल्यास गंभीर जखमी झालेल्यांना हॉस्पिटलमध्ये तत्काळ उपचारासाठी नेण्यास राज्य सरकारने 108 नंबरची अँम्बुलन्स वाहने उपलब्ध केली आहेत.

पाठ 15

पारंपारिक वाहतूक आणि संपर्क

J5S8M1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,


- वाहतूकीसाठी केला जाणारा प्राण्यांचा उपयोग ओळखशील.
- प्राण्यांशी सद्‌भावनेने वागशील.
- वहातुकीमध्ये होत असणारे बदल ओळखशील.

खालील चित्रांचे निरीक्षण कर आणि तुला त्यामध्ये विशेष काय आढळते ते लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED







- तुझ्या परिसरातील लोक वाहतुकीसाठी प्राण्यांचा उपयोग करतात का ?

  _____


- कोणकोणत्या प्राण्यांचा उपयोग करतात ?


  _____

- या प्राण्यांचा उपयोग कोणत्या प्रकारच्या वाहतुकीसाठी करतात ?


  _____


खाली दिलेली चित्रे बघ. वाहतुकीमध्ये झालेले बदल ओळख आणि क्रम दर्शविण्यास क्रमाने संख्या लिही.







@IITBS NOT TO BE REPUBLISHED













पूर्वीच्या काळी वाहतुकीसाठी कोणते प्राणी उपयोगिले जात असत याची माहिती करुन घे आणि त्यांची नावे दिलेल्या चौकानात लिही.

वाहतुकीसाठी आता कोणत्या प्राण्यांचा उपयोग करतात त्यांची नावे लिही.

पूर्वी व आता वाहतुकीसाठी केला जाणारा प्राण्यांचा उपयोग यातील फरक वडिलधाऱ्यांच्या मदतीने माहिती करुन घे व लिही.

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वाहतुकीसाठी उपयोगिल्या जाणाऱ्या प्राण्यांची लोक काळजी कशी घेतात? दिलेल्या जागेत लिही.

_____

_____

_____

_____

वाहतुकीसाठी उपयोगिल्या जाणाऱ्या प्राण्यांची काळजी कशी घेतली पाहिजे? वडिलधाऱ्यांच्या सहाय्याने माहिती करुन घे व दिलेल्या जागेत लिही.


_____

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.


वाहतुकीसाठी उपयोगिल्या जाणाऱ्या प्राण्यांविषयी आमच्यात सद्‌भावना आणि प्रेम असले पाहिजे.

वाहतुकीसाठी उपयोगिल्या जाणाऱ्या प्राण्यांची चित्रे जमा कर आणि चिकटव किंवा त्यांची चित्रे काढ.

खालील चित्रांचे काळजीपूर्वक निरीक्षण कर. एक उदाहरण दिलेले आहे. त्यात दिलेली माहिती वाच आणि योग्य जोड्या जुळव.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED



तुझ्या जवळच्या पोस्ट ऑफिसला भेट दे. किंवा पोस्टमनला भेट आणि खालील बाबतीत माहिती जमा करुन लिही.





तिकिट	
पोस्ट पाकिट	
पार्सल	
स्पीड पोस्ट	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या मित्राला / मैत्रिणिला गावच्या यात्रेला येण्यास आमंत्रण देणारे पत्र पोस्ट कार्डवर लिही. त्याचा / तिचा पत्ता पत्रावर लिहुन पत्र पोस्ट पेटीत टाक.

	प्रति, _____ _____ _____

खालील चित्रांचे काळजीपूर्वक निरीक्षण कर. तु आणि तुझ्या कुटुंबातील सदस्याकडून उपयोगिल्या जाणाऱ्या संपर्क साधना समोर (✓) अशी खुण कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पूर्वीच्या काळी उपयोगिल्या गेलेल्या आणि आता संपर्कासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती जमा करून लिही.


पूर्वीची संपर्क साधने	आताची संपर्क साधने

यामध्ये काही फरक आहे का ? निरीक्षण कर.



जाणून घे.

खालील चित्रे बघ आणि त्यांची माहिती वाच.

	या संपर्क साधनावर लिहुन ते पोस्ट ऑफिसच्या मदतीने पाठविले जाते.
	याच्या सहाय्याने दूरच्या व्यक्तिशी प्रत्यक्ष बोलता येते.
	हे संपर्क साधन देशाच्या व जगाच्या वेगवेगळ्या प्रदेशातील बातम्या प्रसिद्ध करते.
	या आकर्षक संपर्क साधनावाटे प्रादेशीक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम प्रसारित होतात.
	या संपर्क साधनाद्वारे प्रादेशीक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बातम्या ऐकू शकतो.
	या आश्चर्यकारक संपर्क साधनावाटे जगातील कोणतीही माहिती कमी वेळेत मिळवू शकतो आणि कोठेही पाठवू शकतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विविध संपर्क साधनांची चित्रे जमा कर. ती चित्रे खाली दिलेल्या तक्त्यात चिकटव आणि त्यांची नावे व थोडी माहिती चित्राच्या समोर लिही.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे :

कोणी काय शोधले ?

- राईट बंधू – विमान
- ग्रॅहम बेल – टेलिफोन
- चार्ल्स् बॅबेज – संगणक
- जॉन बेअर्ड – दूरदर्शन
- मार्कोनी – रेडिओ

तुला हे माहीत आहे का ?

- रेल्वे वाहतुक ही भारतातील सर्वात मोठी वाहतूक व्यवस्था आहे.
- भारतात पहिली रेल्वेगाडी 1853 मध्ये मुंबई ते ठाणे दरम्यान धावली.
- वाळवंटातून प्रवास करण्यास उंटाची शरीर रचना योग्य असते त्याचा उपयोग वाळवंटी प्रदेशात वाहतुकीसाठी केला जातो. म्हणून उंटाला 'वाळवंटातील जहाज' असे म्हणतात.
- पाणबुडी खोल समुद्रातून प्रवास करते.
- पृथ्वीच्या कक्षेपलिकडील पदार्थांचा अभ्यास करण्यात अवकाश यानाचा उपयोग करतात.
- दररोज प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र – दैनिक, आठवड्यातून एक वेळ प्रसिद्ध होणारे वृतपत्र – साप्ताहिक, पंधरा दिवसातून प्रसिद्ध होणारी पुस्तिका – पाक्षिक, महिन्यातून एक वेळ प्रसिद्ध होणारी पुस्तिका – मासिक
- वाहतुकीसाठी उपयोग केलेला पहिला प्राणी – कुत्रा
- जगामध्ये काही अति जलद धावणाऱ्या रेल्वेचा वेग ताशी 350 km. पेक्षा जास्त आहे. अशा रेल्वे बेंगळूर ते हुबळी पर्यंतचे अंतर फक्त एका तासात पार करु शकतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 16


बदलणारी कुटुंबे

X5T2Y9

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- कुटुंब पद्धतीतील झालेले बदल ओळखशील.
- एका साध्या कुटुंब वृक्षातील बदलांची नोंद करशील.

गेल्या वर्षी काढलेले रामय्या आणि राजम्माच्या कुटुंबाचे हे चित्र आहे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ह्या कुटुंबात एकूण किती सदस्य आहेत?

_____

रामय्याला किती मुले आहेत ? ती कोणकोणती ?


_____

_____

गोपीला किती मुले आहेत ? ती कोणकोणती ?

_____

_____



रामय्याच्या कुटुंबात यावर्षी कोणकोणते बदल झाले आहेत ते ओळख.

गोपीला आपले कुटुंब दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे असे का वाटत होते?

_____

_____

पिंकी दुसऱ्या शहरात का जाणार आहे ?

_____

शिला या कुटुंबात का येणार ?

_____

सुरेशच्या घरातील नवीन सदस्य कोण ?

_____

रामय्याचा कुटुंब वृक्ष काढ. कुटुंबातून बाहेर गेलेल्या व्यक्तिच्या नावाला गोल कर आणि कुटुंबात आलेल्या व्यक्तिच्या नावाला चौकोन कर. रामय्याच्या कुटुंबात झालेले बदल ओळख.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

यावर्षी रामय्याच्या कुटुंबात किती सदस्य आहेत ? का ?

_____

_____



जाणून घे.

कुटुंबातील काही सदस्य काही कारणाने दुसरीकडे राहण्यास जातात आणि काही सदस्य त्या कुटुंबात रहायला येतात.

तुझ्या कुटुंबाचा कुटुंब वृक्ष काढ.

तुझ्या कुटुंबात नवीन कोणी रहायला आले असेल तर त्याच्या नावाला 'Δ' अशी खुण ठेव, त्याची माहिती लिही.


नाव	नाते	कोठून आला	येण्याचे कारण

जर तुझ्या कुटुंबातील कोणीतरी दुसऱ्या ठिकाणी रहायला गेले असेल तर त्याच्या नावाला 'O' कर. त्याची माहिती लिही.

नाव	नाते	आताच्या ठिकाणाचे नाव	जाण्याचे कारण

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

येथे दोन कुटुंबांचे कुटुंब वृक्ष दिलेले आहेत. 'O' ही खुण कुटुंबातून बाहेर गेलेले व 'Δ'ही खुण कुटुंबात आलेले दर्शवितात.



सलिम आणि फातिमा यांना किती मुले आहेत ?

_____

सलिमच्या कुटुंबात आता किती सदस्य आहेत ?


_____

सलिमच्या कुटुंबातील बाहेर गेलेले सदस्य किती ?

_____

सलिमच्या कुटुंबातील नवीन आलेले सदस्य किती ?

_____



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

राजूच्या कुटुंबात किती सदस्य आहेत ?

_____

राजूच्या कुटुंबात किती नवीन सदस्य जोडले गेले आहेत ?

_____

राजूच्या कुटुंबातून किती सदस्य बाहेर गेले आहेत ?

_____

राजू आणि सलीम यांच्या कुटुंबांची तुलना कर. कोणते कुटुंब मोठे आहे ? का.

_____

_____

तुमच्या घरातील वडिलधाऱ्यांच्या मदतीने तुमच्या कुटुंबाचा मागील 4 वर्षाचा व आता असलेल्यांचा कुटुंब वृक्ष काढ.

मागील 4 वर्षाचा कुटुंब वृक्ष	सध्याचा कुटुंब वृक्ष

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तू तयार केलेल्या कुटुंब वृक्षांची तुलना कर.

त्यातील मोठे कुटुंब कोणते ?

_____

गेल्या चार वर्षामध्ये तुझ्या कुटुंबात काही बदल झाले आहेत का ? जर होय, तर कारणे लिही.

_____

_____

_____

_____

तुझ्या शेजारच्या कुटुंबांचे निरीक्षण कर. त्यातील एका मोठ्या कुटुंबाचा व एका लहान कुटुंबाचा कुटुंबवृक्ष काढ.

मोठे कुटुंब	लहान कुटुंब

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कुटुंबातील सदस्य दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर का करतात याची कारणे तुमच्या घरातील वडिलधाऱ्या व्यक्तिंच्याकडून माहिती करुन घे. कारणांची यादी करुन येथे लिही.

_____

_____

_____

_____

_____

हे तुला माहीत आहे का?

- धारवाडहून 25 km अंतरावर असलेल्या लोकुरु गावातील एका कुटुंबात 7 पिढ्यापासूनचे लोक अजूनही एकत्र राहतात. आता या मोठ्या कुटुंबात 180 जण आहेत.
- बेंगळूर येथे राहणाऱ्या एम.एम. उद्योग नावाने ओळखल्या जाणाऱ्या कृष्णमुर्ती यांच्या कुटुंबात एकूण 40 लोक एकत्र राहतात.
- गैरसमज, एकमेकातील असहकार, कामांची असमान वाटणी, नवीन गरजा इत्यादी कारणामुळे मोठी कुटुंबे लहान कुटुंबात बदलत आहेत.
- कुटुंब वृक्ष किंवा 3 पिढ्यांची माहिती ही काही घटना व आर्थिक व्यवहार यासाठी उपयोगी असते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

◆ ◆ ◆ ◆

पाठ 17

घर–ही पहिली शाळा

M3D5I4

या पाठाच्या अध्यायनानंतर तू,

- कुटुंब हा एक लहानसा घटक ज्याच्यात स्वतःचा धर्म, मुल्ये आणि सांस्कृतिक वारसा असतो हे जाणून घेशील.
- कुटुंबातील मुल्यातील बदलामुळे समाजात सुद्धा बदल घडतात याचे निरीक्षण करशील.



पवित्रा

माझे वडील दररोज सकाळी देवाची पुजा करतात. रात्री आम्ही एकत्र जेवण करतो. माझे वडील नेहमी माझ्यासाठी आणि माझ्या भावासाठी पुस्तके व पेनं आणतात. ते आम्हाला सांगतात की सर्वांचा आदर करावा आणि दुर्बल व्यक्तींना मदत करावी. ते मुलांना मिठाई वाटतात. दरवर्षी आम्ही आमच्या गावच्या जत्रेला जातो.



रजिया

शुक्रवार हा आमचा सुट्टीचा दिवस. त्या दिवशी मी आणि माझी आई आमच्या घरी नमाज पढतो माझे वडील व भाऊ मशीदमध्ये जाऊन नमाज पडतात. रमजान सणाच्यावेळी आम्ही गरिबांना मदत करतो. माझी आजी सांगते की सगळ्यांशी चांगले वागा आणि सर्वांशी आदराची समभावना ठेवा. माझी आई जेव्हा रिकामी असते तेव्हा ती मला अरेबीक भाषा शिकविते.



जॉन

रविवार हा आमचा सुट्टीचा दिवस. त्या दिवशी आमच्या कुटुंबातील सर्वजण चर्चमध्ये जातात आणि प्रार्थना करतात. आईवडिलांना त्या दिवशी सुट्टी असते. आम्ही रात्री एकत्र जेवण करतो. माझी आई जेव्हा रिकामी असते तेव्हा ती घराची सजावट करते, बायबल वाचते आणि आम्हाला गोष्टी सांगते. माझे वडील सांगतात की आम्ही एकमेकांशी भांडण करायचे नाही, तर सर्वांबरोबर मित्रासारखे वागावे.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

वेगवेगळ्या धर्माच्या लोकांचे वेगवेगळे स्वतःचे धार्मिक सण असतात परंतु प्रत्येक धर्म या गोष्टीवर जास्त महत्व देतो की चांगले वर्तन मोठयांचा आदर, गरिबांना मदत, प्रेम आपुलकी आणि सर्वांशी मैत्रीची भावना असावी.

तू पवित्रा, रजिया आणि जॉन यांच्या कुटुंबाबद्दल शिकला आहेस. आता तुमच्या कुटुंबाबद्दल माहिती लिही.

दररोज तुम्ही तुमच्या घरी काय काय करता?

_____

_____

_____

घरकामामध्ये तुमच्या कुटुंबातील व्यक्ती एकमेकाला कशी मदत करतात ?

_____

_____

_____

मित्रांशी आणि मोठया व्यक्तीशी कसे वागावे हे वडिलधारी माणसे कसे सांगतात?

_____

_____

_____

तुमच्या घरामध्ये साजरे केले जाणारे सण याबद्दल माहिती लिही.

_____

_____

_____

_____

_____

_____




जाणून घे.

कुटुंब म्हणजे एक लहानसा घटक याच्यात स्वत:चा धर्म, मुल्ये व सांस्कृतिक वारसा असतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खाली दिलेल्या चित्रांचे आणि संभाषणांचे अवलोकन कर व खालील प्रश्नांची उत्तरे दे.



कुटुंबाने मुलांना दिलेल्या उच्च शिक्षणामुळे समाजाला त्याचा कसा उपयोग होतो?

_____

_____

_____



समाजाला उपयुक्त असणारा वृद्धाश्रम चालविण्यास कोणत्या गोष्टी प्रेरणा देतात?

_____



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आईच्या गुणांचे अनुकरण केल्याने समाज आणि पर्यावरणाला कशी मदत होते?

_____

_____

_____



जाणून घे.

कुटुंबातील मुल्यामध्ये जसे बदल होत जातात, तसे समाजात सुद्धा बदल होतात.

उदाहरणार्थ,

- स्त्रिया सर्व क्षेत्रात काम करीत आहेत.
- बालविवाह पद्धत कमी झाली आहे.
- शिक्षण हा सर्व मुलांचा मूलभूत हक्क बनला आहे.

शाळेच्या वाचनालयात जा आणि महात्मा गांधीजींच्या जीवनावर आधारित असलेली पुस्तके वाच. तुझ्या घरातील वडिलधाऱ्यांकडून किंवा शिक्षकांच्याकडून गांधीजी बद्दल माहिती समजून घे आणि खालील प्रश्नांची उत्तरे दे.

गांधीजीनी आपल्या कुटुंबाकडून कोणत्या गुणधर्मांची आणि मूल्यांची शिकवण घेतली?

_____

_____

_____

_____

समाजाच्या पुनर्निर्मितीसाठी ही मूल्ये कशी मदत करतात?

_____

_____

_____

_____

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मोठेपणी तुला काय व्हावेसे वाटते? आणि का ?

_____

_____

_____

_____

समाजाला त्याची कशी मदत होईल ?

_____

_____

_____

_____

खाली दिलेली गोष्ट काळजीपूर्वक वाच आणि कारणे लिही.



जाणून घे.

दोन मुलांची गोष्ट

चंद्रण्णा त्याच्या गावाकडून दुसरीकडे जात असतांना रस्ता चुकला. तो अतिशय थकला होता. त्याला विश्रांतीची गरज होती. जवळच त्याला एक घर दिसले. तो तेथे गेला. तेथे दरवाज्यात एक मुलगा उभा होता. चंद्रण्णाला पाहुन तो ओरडला ''पकडा त्यांना, त्याने किंमती वस्तूची चोरी केलेली आहे''. चंद्रण्णा घाबरला आणि तेथून पळत सुटला शेवटी गल्लीच्या टोकाजवळील दुसऱ्या घराजवळ आला. त्या घरच्या दरवाज्याजवळ एक मुलगा होता. त्याने चंद्रण्णाकडे पाहिले आणि म्हणाला ''कृपया आत या. मी तुम्हाला एक पेला पाणी देऊ का?'' चंद्रण्णा मुलाने दिलेले पाणी प्याला. दोन मुलांच्या अशा वेगवेगळया वागणूकीबद्दल विचार करत तो घराकडे निघाला.

''पकडा त्याला त्याने किंमती वस्तूची चोरी केली आहे''. असे पहिला मुलगा का म्हणाला? कल्पना करून लिही.

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दोन मुलापैकी कोणता मुलगा चंद्रण्णाला आवडेल? आणि का ?

_____

_____

_____

या दोन मुलांच्या वागणूकीत फरक का आहे ?

_____

_____

_____

हे तुला माहीत आहे का ?

- जैन लोक कट्टर अहिंसावादी असतात. त्यांच्या आहार घेण्याच्या सवयीवरुन हे आपण पाहु शकतो. ते फक्त शाकाहारी आहार सेवन करतात. ते वनस्पती आहारातील मुळे सुद्धा खात नाहीत. कारण मुळे बाजूला काढली की वनस्पती मरते.
- कोडगू गावचे मेजर जनरल करियप्पा हे स्वतंत्र्य भारताच्या सैन्य दलाचे पहिले मुख्याधिकारी होते. दोन भारतीयांपैकी ह्या उच्च स्थानांवर पोहचलेली ही पहिली व्यक्ती होय. त्यांनी बालपणीच आपले वडील आणि कुटुंबाकडून शिस्त, धैर्य आणि आत्मसमर्पण इत्यादी मुल्ये शिकली होती.
- प्रसिद्ध कवी डी.व्ही. गुंडाप्पा यांचे सुपुत्र बी.जी.एल् स्वामी हे प्रसिद्ध वनस्पती शास्त्रज्ञ होते. त्यांच्या ''हसीरु होन्नु'' या प्रसिद्ध पुस्तकामध्ये त्यांच्या वडिलांच्या साहित्याचे कौशल्य दिसून येते. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे एक महत्वाचे संदर्भ पुस्तक आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 18

व्यक्तिंची वैशिष्ट्ये

I9F4B5

या पाठाच्या अध्यायनानंतर तू,

- कुटुंबातील सदस्यांची आणि मित्रांची चांगली लक्षणे व कौशल्य ओळखशील.
- प्रत्येक जण एक अद्वितीय आहे हे ओळखशील.
- मुलांच्या विशिष्ट गरजा बाबत संपर्क साधण्याच्या पद्धती शिकशील आणि त्याच्या बदल भावनात्मक प्रत्युत्तर देशील.

पुढील आठवड्यात लताच्या शाळेत **प्रतिभा कारंजी** स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्या दिवशी शिक्षकांनी अनेक स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्पर्धाची यादी सूचना फलकावर लावण्यात आली आहे. शाळा सुटल्यानंतर लता आणि तिच्या मित्र-मैत्रिणिनि स्पर्धांमध्ये भाग घेण्या संबंधी चर्चा सुरु केली.

लता : राजू, तू चांगली चित्रे काढतोस, तुझे नाव तू चित्रकला स्पर्धेसाठी नोंदव.

राजू : लता, तुझा आवाज चांगला आहे. तू गाण्याच्या स्पर्धेत का भाग घेत नाहीस?



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

महमद : रिता, तु चिखलापासून वस्तू बनव. तू त्या स्पर्धेतील एक उत्कृष्ट स्पर्धक आहेस.

रिता : महमद उत्कृष्ट अभिनय करतो. लता, तो नाट्य स्पर्धेत का भाग घेत नाही?

त्यांनी आपापसात चर्चा केली आणि स्पर्धेमध्ये भाग घेण्याचे ठरविले.

खालील प्रश्नांची उत्तरे दे.

लता आणि राजू यांनी कोणत्या स्पर्धेत भाग घेण्याचे ठरविले ?

_____

_____

रिताने महमदबाबत स्पर्धेसंबंधी काय सुचविले ?

_____

_____

महमदने चिखलाचे नमुने करण्याबाबत रिताला कोणता सल्ला दिला?

_____

_____

तुमच्या शाळेच्या प्रतिभा कारंजीच्या कोणत्या स्पर्धेत तू भाग घेऊ इच्छितोस ? का?

_____

_____

_____

तुझ्याकडे कोणते विशेष कौशल्य आहे का ? येथे खाली लिही.

_____ _____

_____ _____

_____ _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तू निरीक्षण केलेले तुझ्या मित्रांच्यातील विशेष कौशल्यांची यादी कर.

उदाहरणार्थ :

मित्राचे नाव	विशेष कौशल्य
रामू	अभिनय

तुझ्या कुटुंबातील सदस्यांची यादी कर आणि त्यांच्यातील तुला आवडणारी चांगली लक्षणे यांची यादी कर.

सदस्यांचे नांव	चांगले लक्षण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्या क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या अनेक व्यक्ती कर्नाटक राज्यात होऊन गेल्या. चांगली संधी आणि धैर्य यामुळे त्यांनी बालपणापासून अनेक गोष्टी आत्मसात केल्या होत्या. चार प्रभावी व्यक्तींची थोड़क्यात माहिती येथे दिलेली आहे.


जाणून घे.

डॉ. राजकुमार



डॉ. राजकुमार हे त्यांच्या उत्कृष्ट अभिनय आणि गाण्याच्या कौशल्यासाठी कन्नड चित्रपट सृष्टीत अतिशय प्रसिद्ध होते. चित्रपट सृष्टीतील मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळविणारे ते पहिले कन्नड अभिनेते होत. त्यांनी 200 हून जास्त चित्रपटाम ध्ये काम केले आहे. अभिनयाची कला त्यांना त्यांच्या वडिलांच्याकडून मिळाली होती. त्यांनी आपल्या वयाच्या 8 व्या वर्षापासून बालकलाकार म्हणून अभिनय करण्यास सुरुवात केली होती.

कुप्पाली वेंकटप्पा पुट्टाप्पा (कुवेंपु)



कुपळी येथे जन्मलेले कुवेंपु हे राष्ट्रीय कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'जय भारत जननिय तनुजाते' हे नाडगीत लिहिले आहे. जे आपण दररोज शाळेत म्हणतो. ज्ञानपिठ पुरस्कार मिळविणारे ते पहिले कवि होत, त्यांनी मुलांच्यासाठी 'किंदर जोगी', 'नन्न गोपाला', 'आमलन कथे' इ. साहित्य निर्मिले आहे. ते लहानपणापासूनच कथा, कविता आणि पुस्तके लिहिण्यात प्रसिद्ध होते.

कित्तूर राणी चन्नम्मा



चन्नम्मा यांचा जन्म बेळगावी जिल्ह्यातील काकती येथे झाला. ती एक धाडशी मुलगी होती. बालपणीच तिने घोड्यावर बसणे, तलवार चालविणे व भाला फेकणे या युद्ध कला शिकल्या होत्या. युद्ध करण्याचे कौशल्य तिने आत्मसात केले होते. कित्तूरचे राजे मल्लसर्ज देसाई यांच्याशी तिचा विवाह झाला आणि ती कित्तूरची राणी बनली. मल्लसर्जांच्या मृत्यूनंतर तिने इंग्रजांशी मोठ्या धैर्याने लढा दिला आणि ती एक धाडशी महिला ठरली.

गंगूबाई हनगल



गंगुबाई हनगल यांचा जन्म धारवाड येथे झाला. त्या भारतात गायिका म्हणून प्रसिद्ध आहेत. वयाच्या 13 व्या वर्षी तिच्या पालकांनी तिची संगितातील आवड ओळखून तिला संगीत विद्यालयात दाखल केले. हिंदुस्तानी आणि कर्नाटकी संगीताचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भारतात अनेक ठिकाणी कार्यक्रम केले. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. रेडिओवरुन अनेक संगीत कार्यक्रम त्यांनी सादर केले. त्या हिंदुस्तानी संगीतमध्ये अतिशय प्रसिद्ध होत्या.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनेक लोकांनी त्यांच्यातील विशेष गुणवत्ता आणि कौशल्य यामुळे मोठेपण मिळविले आहे. तुझ्या शाळेच्या वाचनालयातून पुस्तके घेऊन अशा मोठया व्यक्तिंची माहिती वाच.

तुझ्या परिसरातील विशेष गुणवत्ता व कौशल्य असणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तिंची यादी कर. वडिलधाऱ्यांच्या मदतीने त्यांची माहिती जमा कर आणि खाली दिलेल्या तक्त्यात लिही.

प्रसिद्ध व्यक्ती	विशेष गुणवत्ता/कौशल्य

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमचे शिक्षक / पालकांच्या मदतीने कर्नाटकातील प्रसिद्ध कवि, कलावंत, शास्त्रज्ञ, गायक आणि समाज सुधारक यांची माहिती मिळव. शाळेच्या वाचनालयातून पुस्तके घेऊन त्यांच्या कार्याचे वाचन कर. तुला आवडणाऱ्या व्यक्तिबद्दल चार ओळी माहिती लिही. त्यांना बालपणी मिळालेली प्रेरणा आणि सहकार्य ओळख.

_____

_____

_____


_____

शारीरिक अपंग असलेल्या अनेक लोकांच्यामध्ये विशेष गुणवता व कौशल्य असते. गुणवत्तेवरुन त्यांनी जगाला आपले विशेष कर्तृत्व दाखविले आहे.

त्यापैकी एकाची माहिती येथे दिली आहे.

जाणून घे.

थॉमस अल्वा एडीसन्



छोटा एडीसन शाळेत गणित विषयात अतिशय मागे होता. त्याला शब्दांचा उच्चार करणे फार कठीण जात होते. हा बालक शाळेत दाखल झाल्यानंतर तीन महिन्यातच त्याला ताप आला. त्यात झालेल्या संसर्गाने त्याची ऐकण्याची शक्ती कमी झाली. तेव्हापासून त्याचे शाळेत जाणे बंद झाले. त्याच्या आईने त्याला घरातच शिकविले. हाच बालक मोठा होऊन अनेक उपकरणाचा प्रसिद्ध शोधक बनला. आपल्या घरात प्रकाश देणाऱ्या विद्युत बल्बसारखी अनेक उपकरणे शोधून काढणारी महान व्यक्ती म्हणजे थॉमस् अल्वा एडीसन.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

एडीसन्च्या जीवनापासून तुला काम जाणवले ते लिही.

_____

_____

_____

मागील इयत्तेत ज्या व्यक्तिंना ऐकण्यात आणि बोलण्यात समस्या आहेत ते कशाप्रकारे खूणाद्वारे बोलतात हे तू समजून घेतला आहेस. यात बोलताना अक्षरखूणांचा वापर करतात हे तुला माहीत आहे का?

यांचे निरीक्षण करा.

a 



b 

c 

d 

बोटांचा वापर करून ही अक्षरे कशी समजावतात ते पहा.

हात आणि बोटे यानी केलेल्या विशिष्ट खुणांचा अर्थ ओळखा.

	राग
	आणखी एक
	मी एकटा आहे
	उठ किंवा उभा रहा
	आश्चर्य

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

आंधळेपणा असणारे लोक वाचण्यास व लिहिण्यास ब्रेल लिपीचा उपयोग करतात. स्पष्ट बोलता न येणारे आणि मुके लोक खुणा करुन दुसऱ्यांशी संपर्क साधतात. त्याना तसे करणे आवडते. अशा लोकांना स्वतंत्रपणे विशेष शिक्षण देणे आवश्यक असते. आम्ही त्यांना आमच्या बरोबर समानतेची वागणूक दिली पाहिजे.

- तुझ्या गावातील शारीरिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिंना ओळख. त्यांच्यातील विशेष कार्य केलेल्या व्यक्तिंची माहिती मिळव.

हे तुला माहीत आहे का ?



सर एम. विश्वश्वरय्या हे एक प्रसिद्ध अभियंता होते. बाल-पणापासूनच त्यांच्यात विविध कौशल्यांचे ज्ञान होते. त्यांनी हजारो लोकांना उपयोगी होतील अशी अनेक धरणे, कारखाने व रस्ते बांधले. त्यांचे कार्य पाहून भारत सरकारने सन 1955 मध्ये भारतरत्न हा सर्वश्रेष्ठ नागरिक पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.



मदर तेरेसा यांनी आपले संपूर्ण आयुष्य आजारी लोक, दुर्बल लोक व अनाथ बालके यांच्यासेवेसाठी घालविले. त्यांनी केलेल्या मानवतेच्या महान कार्याबद्दल त्यांना नोबेल पुरस्कार देण्यात आला.



कन्नड अभिनेते टि.एन. बालकृष्ण हे बहिरे होते. परंतू त्यांचा अभिनय वाखाणण्याजोगा होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 19


उद्योगांची वैशिष्ट्ये

Q7R1N1

या पाठाच्या अध्यायनानंतर तू,

- तुमच्या परिसरातील आणि इतर ठिकाणच्या वेगवेगळ्या व्यवसायिकाना ओळखशील.
- बालकामगारांच्या समस्या जाणून घेशील.

हे सोमूचे घर आहे. या घरामध्ये अनेक वस्तू आहेत. त्या दररोज घरात वापरतात. त्या वस्तू कशापासून बनलेल्या आहेत ? त्या कोणी तयार केल्या आहेत ? वडिलधाऱ्या व्यक्तीकडून जाणून घे आणि उत्तरे दे.



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

रामनहळ्ळी हे छोटेसे गाव आहे. त्या गावचे लोक वेगवेगळी कामे करत असलेले चित्रामध्ये दर्शविले आहे. हे लोक कोणते काम किंवा उद्योग करीत आहेत? दिलेल्या जागेत लिही.





कामे

1. _____ 6. _____
2. _____ 7. _____
3. _____ 8. _____
4. _____ 9. _____
5. _____ 10. _____


वेगवेगळी कामे करणाऱ्या व्यक्तिंची चित्रे येथे दिलेली आहेत. ते कोण आहेत? ते कोणते काम करीत आहेत ? दिलेल्या जागेत लिही.







_____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____





_____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED




_____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____

हे तुम्हाला तुमच्या परिसरात आढळतात का ? जे तुमच्या परिसरात आढळतात तेथे (✓) असे चिन्ह या कामाव्यतिरिक्त इतर काही कामे करणाऱ्या व्यक्ती ओळखा आणि येथे लिहा.

_____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____


_____ _____ _____ _____


काही व्यवसाय खाली दिलेले आहेत. त्यांच्या प्रमाणे कृती करा आणि त्यांचे काम दाखवा.

1. शेतकरी
2. सुतार
3. शिक्षक
4. डॉक्टर
5. पोस्टमन
6. नर्तक/नर्तिका
7. शिंपी
8. गायक/गायिका
9. फुले विकणारा
10. वाहन चालक

@KYBS NOT TO BE REPUBLISHED

चित्ररुपात दिलेली गोष्ट वाच.





© SCERT NOT TO BE REPUBLISHED

खालील प्रश्नांची उत्तरे दे.

हत्ती कोणकोणत्या व्यावसायिकाकडे गेला?

_____

_____

हत्तीला कोणत्या वस्तू मिळाल्या ?

_____

_____

कुंभाराला हत्तीने कशी मदत केली ?

_____


_____


जाणून घे.

एखादा उद्योग करणारी व्यक्ती दुसरे उद्योग करणाऱ्या व्यक्तिंच्यावर अवलंबून असते.

चित्रांचे निरीक्षण कर. कापड कसे तयार केले जाते ते शिक.








तुम्ही परिधान केलेले कपडे शिवण्यासाठी शिंप्याला कोण मदत करते ? चित्राच्या खाली दिलेल्या चौकटीत लिही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



जाणून घे.

तयार कपड्यांच्या दुकानातून आम्हाला शिवून तयार केलेले कपडे मिळतात. ते बनवण्यासाठी अनेक माणसे काम करतात.

वडिलधाऱ्या व्यक्ती बरोबरच अनेक मुलेसुध्दा अनेक व्यवसायात मग्न असतात.

मागील इयत्तेमध्ये बालकामगारांच्या समस्याबद्दल तुम्ही शिकला आहात. तुम्हाला माहीत आहे का ?

बालकामगारांच्या कोणत्याही चार समस्या लिहा.

_____

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुम्हाला माहीत आहे का ?

- घर सजावटीसाठी वेगवेगळ्या वस्तूंचा आपण वापर करतो. त्या वस्तू वेगवेगळे कलाकार तयार करतात. हस्तकला हा एक त्यापैकी व्यवसाय आहे.
